CR1996101513

क्रमांक: एस.व्ही.सी.आर. ४०९८/स-४/९५,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि
अभिलेख म. राज्य. पुणे यांचे कार्यालय
पुणे, दिनांक १५.१०.१९९६.

15 OCT 1996

## परिपत्रक :

महाराष्ट्रातील वाढत्या नागरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जमिनींना असाधारण महत्व आले असून त्यांच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यामुळे जमिनीचे अभिलेखांची पहाणी करुन संधारण करण्याच्या प्रवृत्तीची जनतेत वाढ झाली आहे. तसेच कर्ज प्रकरणे, बिनशेती प्रकरणे, अभिन्यास तयार करणे इत्यादी कित्येक बाबीसाठी जमिनीचे प्रमाणित अभिलेखांची मागणी मोठया प्रमाणांत वाढली आहे. पर्यायाने भूमि अभिलेख विभागांकडे प्रमाणित नकलांची मागणी मोठया प्रमाणांत वाढलेली आहे. जनतेस प्रमाणित नकला त्वरीत पुरविल्या जाव्यात म्हणून इकडील अधिनस्थ कांही कार्यालयांना झेरॉक्स मशीन पुरविणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील कायदा कलम ३२७ व ३२८ मधील तरतुदी व महाराष्ट्र जमिन महसूल (भूमि अभिलेखाचे निरिक्षण, शोध व प्रती पुरविणे ) नियम, १९७० त्याचप्रमाणे महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एस.टी.एन.१०८०/सी.आर.८५०-८१ ई-८दिनांक १२.२.८५ व २५.३.१९८५ मधील तरतूदी विचारांत घेता महसूल व भूमि अभिलेख खात्याचे कागदपत्रांच्या प्रमाणित नकला जनतेला पुरवितांना काय फी आकारावी त्याबाबत नियम केले आहेत. त्यावेळी सर्व नकला हाताने तयार केल्या जातील हे गृहित धरले होते. परंतु त्यावेळी महाराष्ट्रांत आधुनिक यंत्रसामुग्री उदा: झेरॉक्स मशीन, इलेक्ट्रॉनिक टाईपरायटर इत्यादी यंत्रसामुग्रीचा वापर सुरु झालेला नव्हता. त्यामुळे नकलाबाबतचे नियम तयार करतांना वरील आधुनिक यंत्रसामुग्रीचा विचार करणेत आलेला नव्हता, म्हणून सदर नियमांमध्ये झेरॉक्स मशीनवर नकला देणेबाबत तरतूद नमूद केलेली नाही. तसेच झेरॉक्स व नकलांच्या किंमती आकारण्याबाबतही तरतूद नमुद नाही. त्याचप्रमाणे जनतेची मागणी देखिल मोठया प्रमाणांत आहे. याकामी शासन स्तरावर विचार चालू असून शासनाकडून अंतिम आदेश प्राप्त होणेस अवधी लागणार आहे. सबब त्या अंतरिम अवधीसाठी खालीलप्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

..२/-

भूमि अभिलेख कार्यालयातून देण्यांत येणाऱ्या प्रमाणित नकलांचे खालीलप्रमाणे सर्वसाधारण तीन गट पडतात.

क] भूमापन किंवा महसूल अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या नकला व त्यासंदर्भांत इतर सर्व प्रकारचे कागदपत्र.

ख] फेरफार नोंदी/मिळकत पत्रिकेची नक्कल/किंवा इतर विहीत प्रपत्रांची (Prescribed form ) नक्कल.

ग] नकाशाची नक्कल.

ज्या कार्यालयांना झेरॉक्स मशीन पुरविण्यांत आल्या आहेत, अशा सर्व कार्यालयांना छायांकित प्रमाणित नकला देणे शक्य व्हावे म्हणून खालीलप्रमाणे तात्पुरत्या सुचना देण्यांत येत आहेत :-

१] झेरॉक्स मशीनवर छायाप्रत काढतांना छायाप्रतीसाठी "ए"/३ साईजचा पांढरा कागद वापरावा.
कागदपत्रांच्या नकला झेरॉक्स मशीनवर काढून देतांना खालील दर्शविले-प्रमाणे किंमत आकारणेची आहे.

२] झेरॉक्स मशीनवर वापरुन ए/३ साईज कागदाच्या एका बाजूवर काढलेली प्रत प्रत्येकी पांच[ ५/- रुपये मात्र ]

३] वरीलप्रमाणे नक्कल देतांना छायाप्रत करावयाच्या कागदांचे आकारमान कमी जास्त असले तरी एका बाजूची झेरॉक्स प्रत देण्यास ५/-रुपये फी आकारणेची आहे. हे तत्व लक्षांत घ्यावे. यामध्ये comparing फी, कागद फी व प्रमाणित करण्याची फी या सर्व बाबींचा समावेश आहे.

४] विहित परिमाणांत तयार केलेल्या कोणत्याही नकाशाची नक्कल झेरॉक्स मशीनवर देऊ नये, कारण नकाशाची नक्कल झेरॉक्स मशीनवर काढल्यास तो स्केलाप्रमाणे तंतोतंत १००% बरोबर निघेल याची शाश्वती देता येत नाही. म्हणून सर्व नकाशांच्या नकला पूर्वीप्रमाणेच तयार करुन पूर्वी विहित केलेल्या दराप्रमाणेच फी आकारणेची आहे. त्यामध्यें बदल करणेत आलेला नाही.

५] झेरॉक्स मशीनवर देण्यांत येणाऱ्या नकला संबंधित सक्षम अधिकारी यांनी

प्रमाणित करणेच्या आहेत.

सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरीत होणेची आहे.

स्वाक्षरी/- [लीना मेहेंदळे]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म. राज्य.] पुणे.

प्रत/- उपसंचालक भूमि अभिलेख पुणे/मुंबई/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांचेकडे माहिती व पुढील सत्वर कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत/- अधिक्षक भूमि अभिलेख [सर्व]/ नगरभूमापन अधिकारी [सर्व] तालुका निरीक्षक भूमि अभिलेख [सर्व] यांचेकडे माहितीसाठी व जरूर त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत/- प्राचार्य, प्रशिक्षण शाळा औरंगाबाद यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत/- जमाबंदी उप आयुक्त [सर्वसाधारण] पुणे/ जमाबंदी उप आयुक्त [एकत्रीकरण] पुणे / जमाबंदी उप आयुक्त [भूमापन] पुणे यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.

प्रत/- [सर्व] कार्यालय अधिक्षक यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

" निर्गमित "

जमाबंदी उप आयुक्त,
[सर्वसाधारण] पुणे.

एन. व्हो./१५. १०.